RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 December, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 December, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : पंधरा | अंक : सहावा | डिसेंबर २०१७

अमृत 5

परमात्मा प्रकाशरुप आहे 13

कुणाचे नाव कायम राहते ? 19

अमृतवेळ 29

वाण्याचा मुलगा 31

धन्य अजायब 34

Website : www.Ajaibbani.org

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



अमृत

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू अमरदेवजी महाराजांची वाणी
हॉस्टन, टेक्सास, अमेरिका – २८ जून, १९८०

बिनु सतिगुर सेवे बहुता दुखु लागा जुग चारे भरमाई।।

जेव्हापासून आपला आत्मा परमात्म्यापासून दुरावला गेला आहे, त्यास ना सुख लाभले ना शांती लाभलेली आहे. तो बेचैन आहे. कोणासही ठाऊक नाही की या जगाची निर्मिती कधी झाली आणि आपला आत्मा परमात्म्यापासून दुरावून किती युगे लोटली. गुरु नानक साहेब सांगतात :

तिथी वार न योगी जाणे ऋुत माह न कोई।
जां करता सृष्टि को साजे आपे जाणे सोई।।

आपण पशु–पक्षांच्या जन्मातही दु:खी असतो, वृक्षाच्या जन्मातही दु:खी असतो किंवा इतर कोणत्याही जन्मात गेलो तरी तेथेदेखील दु:खीच असतो. आपण मनुष्य जन्मात असूनही दु:खी आहोत, कारण अनंत दु:खांनी आपणांस घेरलेले आहे. इतरांबद्दल उगीचच आपणांस गैरसमज असतो की ते सुखी आहेत. त्यांचे म्हणणे आपण लक्षपूर्वक ऐकल्यास ते त्यांच्या दु:खांची पोतडीच आपल्यासमोर उघडतात. कुणी अपत्यहीन असल्याने दु:खी आहे तर कुणी अपत्याकारणी दु:खी आहे. कुणी इतरांना पैसे उधार दिल्याने दु:खी आहे तर कुणी पैशांच्या अभावी दु:खी आहे.

आपण जेथेही नजर फिरवितो तेथे सर्वत्रच आपणांस दु:खच–दु:ख, अडचणीच–अडचणी आढळतात. ज्यांचा विवाह झालेला नसतो ते दु:खाने तळमळत असतात आणि विवाह झालेला जोडप्यांचा आपापसात बेबनाव झाला असला तर तेदेखील बिचारे दु:खी असतात. कबीर साहेब सांगतात:

कोई तो तन मन दुखी कोई चित्त उदास।
एक एक दुख सबन को सुखी सन्त का दास।।

आता गुरुसाहेब सांगतात, ''आपण दु:खात का बरे अडकून पडलेलो आहोत? कारण आपण सतगुरुंना शरण गेलेलो नाही. आपण परमात्म्याची भक्ती केलेली नाही. परमात्म्याने आपणांस मनुष्यजन्माची संधी दिली, तरीही आपण त्या संधीचा फायदा करून घेतला नाही.''

संत–महात्मे या जगास सुखांचे नगर बनविण्यासाठी येत नाहीत. तसा जर त्यांचा उद्देश असता तर आतापर्यंत हे जग स्वर्ग बनले असते कारण उच्च कोटीचे अनेक महात्मा पूर्वी या जगात येऊन गेले आहेत. महात्मा केवळ आपल्या आत्म्यास परमात्म्याशी जोडण्यासाठी येतात. ते समजावतात की आपणांस स्वगृही गेल्यावरच खऱ्या सुखाची प्राप्ती होते. आपले खरे घर सचखंड असून आपला आत्मा सचखंडापासून दुरावून मन–मायेच्या जंजाळात फसल्याने दु:खी झालेला आहे.

हम दीन तुम जुगु जुगु दाते सबदे देहि बुझाई।।

हुजूर सांगत असत,''जर आपल्या अंतरात परमात्मा प्राप्तीची खरी तीव्र इच्छा, विरह आणि तळमळ असेल तर आपण आपल्या अंतरात दीनता धारण केली पाहिजे. परमात्मा सर्व विश्वाचा रचयिता असल्याने, त्याने कुणासमोर दीन व्हावे?'' तुलसी साहेब सांगतात:

तरने को है दीनता डूबन को अभिमान। तुलसी दया न छोड़िये जब लग घट में प्रान।।

गुरु अमरदेवजी परमात्म्यासमोर प्रार्थना करतात, ''हे परमात्मा! आम्ही दीन बनून तुझ्या दारी आलो आहोत, कारण तू सदैव दाता आहेस, तू नेहमी जीवांना माफ करतोस. आम्हांस देखील तू शब्द–नामाचे दान दे, जेणेकरून आम्हीही तुझ्या द्वारी येऊ शकू. कारण नामाशिवाय आम्ही परमात्म्याच्या द्वारी पोहचू शकत नाही, त्याच्या समीप जाऊ शकत नाही.''

मी नेहमी सांगत असतो की, ज्याप्रमाणे परदेशी जाताना आपणांस पासपोर्ट बनवून व्हिसा (परदेशात प्रवेश घेण्याचा परवाना) घ्यावा लागतो, त्याचप्रमाणे आपणांस महात्म्यांद्वारे एक प्रकारचा व्हिसा घ्यावा लागतो.

त्यासाठी परमात्म्याने महात्म्यांची नेमणूक केलेली असते. परमात्मा त्याच्या भेटीचा कोणताही मार्ग ठरवू शकतो. ज्या आत्म्यावर महात्मा त्यांची मोहर लावतात, त्या आत्म्यास कोणताही दंड वा शिक्षा भोगावी लागत नाही.

गुरु नानकदेवजी मक्का येथे गेले असताना, काजी रूकमदीनने त्यांना अनेक प्रश्न विचारले. त्याने गुरु नानकदेवजींना विचारले की, तुम्ही गुरुंचे खूप गुणगान करता की गुरुंशिवाय मुक्ती लाभत नाही. गुरु आपणांस कोठे मदत करतात? गुरु नानक साहेबांनी उत्तर दिले की प्रत्येक जीवास मृत्युनंतर एक नदी पार करावी लागते. हिंदु लोकं तिला वैतरणा नदी असे संबोधतात. गुरु नानकदेवजी तिला मलीन नदी असे म्हणतात. प्रत्येक जीवास ती नदी पार करावी लागते. जीवाच्या डोक्यावर पाप–पुण्याचे ओझे लादलेले असते, मागून यमदुत सोट्याने मारत असतात. पुढे चढण असते. तेथे असलेली चढण चढणे जीवास अवघड असते.

बे पीरा बे मुर्शिदा कोई न पूछे बात।

त्या ठिकाणी ज्या जीवास गुरु लाभलेले नसतात, अशा जीवाचे गाऱ्हाणे कोण ऐकणार? परंतु जर गुरु लाभलेले असतील तर ते गुरु आत्म्यास त्या नदीवर जाऊच देत नाही. जीव शरीर सोडत असतानाच गुरु येऊन त्या आत्म्याचा सांभाळ करतात. जे जीव नामाची कमाई करतात, त्या जीवांना मृत्युपूर्वी एक–दोन दिवस अगोदरच सतगुरु सावध करतात. त्यांना आपल्या मृत्युची पूर्वकल्पना येते. माझा स्वानुभव आहे की, मृत्युसमयी होणाऱ्या वेदनांनी जेव्हा एखादा आत्मा दु:खाने खूप ओरडत असतो व तो शरीर त्यागण्याच्या तयारीत असतो, त्यावेळी एखाद्या सत्संगी व्यक्तीने त्याच्या शेजारी जाऊन नामस्मरण केल्यास, त्यास शांती मिळेल आणि तो आत्मा शांतीपूर्वक शरीर सोडून जाईल.

ही सिंहपुरा गावातील अनेक वर्षांपूर्वीची घटना आहे. माझ्या एका मित्रास एक मुलगा होता, ज्यास देवीचा रोग झाला होता. त्या मुलाचे आई–

वडिल अतिशय दु:खी होते, कारण तो मुलगा तरुण होता. त्या मुलास नाम मिळालेले नव्हते. त्याच्या आई–वडिलांना हुजूर कृपालजींकडून नाम मिळालेले होते. हुजूरांनी त्यांना सांगितले की, मुलगा काही वाचणार नाही. तो पुन्हा या जगात जन्म घेऊन येईल. त्या मुलास खूप वेदना होत होत्या. मी जेव्हा त्याच्या जवळ जाई, तेव्हा तो शांत होई. त्या मुलाने माझ्याकडे खूप याचना केली की, जेव्हा तुम्ही माझ्या जवळ येता तेव्हा मला किडे दंश करीत नाहीत. मला भयानक चेहरेदेखील दिसण्याचे थांबतात. त्यामुळे तुम्ही माझ्या जवळच थांबत जा. अशा अवस्थेत तो मुलगा चार दिवस होता. त्यावेळी मी त्याच्या जवळ जेव्हा जात असे, तेव्हा तो शांत होई.

हुजूरांनी त्या मुलाच्या आईस म्हटले,''मुलाच्या मृत्युनंतर तू रडू नकोस. त्याचा पुनर्जन्म अमुक–अमुक गावात होणार असून तू तुझ्या इच्छेनुसार तेथे जाऊन यास पाहू शकशील. आजपासून चौथ्या दिवशी रात्री बारा वाजता हा मुलगा शरीर सोडणार आहे. जाताना आम्ही चहा पिऊन जाऊ.''

त्या मुलाच्या आईने स्वत:च्या भावनांना आवर घातला. रात्री निद्रावस्थेत असताना हुजूरांनी तिला अर्धा तास अगोदर जागृत केले की चहा तयार कर जाण्याची वेळ झालेली आहे. त्यावेळी मी मुलाच्या शेजारीच बसलेलो होतो. त्याच्या आईला खात्री होती की जोपर्यंत मी चहा पाजणार नाही, तोपर्यंत मुलगा शरीर त्यागणार नाही. मी आणि त्या मुलाने चहासाठी त्या मातेस हाक मारली. चहा प्यायल्यावर त्या मुलाने हुजूरांचे नाव घेऊन माझ्या छातीवर हात ठेवून अशा रितीने शांतपणे पडला जसे तो खूप कालावधीपासून निद्राधीन असावा. मृत्यु होताना तो अतिशय शांत होता.

त्यावेळी तेथे चार–पाच सत्संगी होते. दोन–तीन तासांपूर्वीच त्या सर्वांना दर्शन देऊन हुजूरांनी जाणीव करून दिली की मी त्या आत्म्यास नेण्याकरीता आलेलो आहे. ते सर्वजण आपापल्या घरून उठून त्या मुलाजवळ येऊन बसले. त्या सत्संगी प्रेमींनी सांगितले की, आम्ही निद्रित होतो.

आम्हांस हुजूरांचे दर्शन झाले व असा–असा अनुभव झाला. प्रत्यक्षाला प्रमाण देण्याची गरज नसते. कोणत्याही सत्संगीने ध्यान–अभ्यास करून स्वत:च्या कर्तव्याची आपूर्ती करून पहावी की सतगुरु कधीही त्यांच्या जबाबदारीपासून मागे सरत नाहीत.

हरि जीउ कृपा करहु तुम पिआरे।।
सतिगुरु दाता मेलि मिलावहु हरिनामु देवहु आधारे।।

आता गुरु अमरदेवजी परमात्म्यासमोर प्रार्थना करीत आहेत. हे परमात्मा! तू आमच्यावर कृपा–दृष्टी ठेव. तुझ्या कृपा–दृष्टीनेच आम्ही सतगुरुंना भेटू शकतो. तू कृपा केल्यावरच सतगुरु आम्हांला नाम देऊ शकतात. कोणत्याही महात्म्यास त्यांच्या सेवकांची मोठी पलटण तयार करायची नसते, त्यांना खूप मोठ्या प्रमाणात शिष्य बनविण्याची आवड नसते. ही तर सतगुरुंची कृपा आहे की ते आपणांस नामदानाचे बक्षिस देतात.''

मनसा मारि दुबिधा सहजि समाणी पाइआ नामु अपारा।।
हरि रसु चाखि मनु निरमलु होआ किलबिख काटणहारा।।

आपण कितीही पापी वा दुष्कर्मी मनुष्य असोत. आपण जर शब्द नामाची कमाई केली, सतगुरुंवर पूर्ण विश्वास ठेवला, तर नामाच्या कमाईने आपली सर्व पापे नष्ट होतात. नाम हे पापांचे नाश करणारे औषध आहे. कबीर साहेब सांगतात :

जब ही नाम हृदय धरयो भयो पाप का नाश। मानो चिंगी आग की पड़ी पुरानी घास।।

सहजोबाई म्हणतात :

पहले बुरा कमाएके बांधी बिख की पोट। कोट कर्म छिन में कटे जब आए गुरु ओट।।

कबीर साहेब म्हणतात :

सोना काईं न लगे लोहा घुन न खाए। बुरा भला जो गुरु भक्त कबहू नर्क न जाए।।

शिष्य खरा गुरू–भक्त तेव्हाच बनतो जेव्हा तो आपले जगात विखुरलेले लक्ष एकवटून त्याच्या नेत्रांच्या मागे एकाग्र करतो व सूर्य, चंद्र, तारे पार करीत पुढे जातो, तेव्हा त्याच्यासमोर गुरू स्वरूप येते. नामस्मरण आपणांस तिथपर्यंत घेऊन जाते. तेथे पोहचल्यावर गुरू–भक्ती पूर्ण होते. त्याच्या पुढील मंडळांमध्ये नेण्याचे काम गुरूंचे असते. गुरू त्यास आपल्यासोबत घेऊन जातात व पुढील मंडळे पार करवितात.

सबदि मरहु फिरि जीवहु सदही ता फिरि मरणु न होई।।

आता गुरुसाहेब सांगतात,''आपणांस शब्दामध्येच मरावयाचे आहे आणि शब्दामध्येच जगावयाचे आहे. जिवंतपणी मरणे याचा अर्थ मृत्युनंतर ज्या ठिकाणी आपणास जायचे आहे, ते ठिकाण जिवंतपणीच पाहणे होय.''

अंम्रितु नामु सदा मनि मीठा सबदे पावै कोई।।

आपण सांगत आहात, जेव्हा आपला आत्मा जीवनरूपी जल म्हणजे **अमृत** प्राशन करतो, तेव्हा तो कायमस्वरूपी अमर बनतो. बाह्यजगात असे कोणतेही जल नाही जे आपले आयुष्य हिरवेगार करील, आपले जीवन अमर बनवेल; ते जल आपल्या अंतर्यातच आहे. आपण जेव्हा आपल्या आत्म्यावरील स्थूल, सूक्ष्म आणि कारण ही तीव्र आवरणे दूर सारतो, तमोगुण, रजोगुण आणि सतोगुणांच्या पलिकडे जातो, तेथे पंचवीस प्रकृती, मन आणि माया असते. आपण जेव्हा त्यांना दूर करतो, तेव्हा आपला आत्मा पवित्र होतो आणि दशमद्वारी पोहचतो. आपल्या अंतर्यात जेव्हा सत्गुरु प्रगट होतात तेव्हा ते आपणांस अमृताने भरलेला पेला देतात. कुणा महात्म्याने त्यास **अमृत** म्हटले, तर कुणी महात्म्याने त्यास जीवनाचे जल असे संबोधले आहे. मुसलमान त्यास आबे–हयात असे म्हणतात. परंतु आपले भांडे अजून उलटे आहे. ते **अमृत** आपल्या अंतर्यात ठिबकत आहे, परंतु काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार ते **अमृत** प्राशन करीत आहेत. ते भांडे आपण सरळ करावयाचे आहे. गुरु नानकसाहेब सांगतात:

ऊँधे भांडे कछु न समावे, सीधे पवे अमृत धारा।

आपले भांडे उलटे पडलेले असल्यास, भले वर्षभर पाऊस पडत राहो, त्या भांड्यामध्ये एकही थेंब पडणार नाही. आपले भांडे जर आपण सरळ केले तर पहिल्या नाहीतर दुसऱ्या नाहीतर तिसऱ्यातरी पावसाने ते भांडे भरून जाईल. गुरुसाहेब म्हणतात :

अमृत रस सतगुरु चुवाया, दसवें द्वार प्रकट होय आया।
नानक अमृत एक है पाईऐ गुरु प्रसाद।
तिनि कीता रंग सो जिनको लिखया आद।।

दातै दाति रखी हथि अपणै जिसु भावै तिसु देई।।

गुरुसाहेब सांगत आहेत,''कदाचित कुणाला असे वाटत असेल की, महात्मा तर जगात सदैव येतच असतात, मग आपण आपल्या मर्जीनुसार महात्म्यांकडे जाऊन अमृतरूपी दान घेऊ शकतो. परंतु ज्या महात्म्यांची आंतरिक दृष्टी जागृत झालेली असते, ते सांगतात की, सर्वकाही परमात्म्याने स्वत:च्या हातात ठेवलेले आहे की, कुणास नामाचे **अमृत** पाजायचे आणि कुणास अजून या जगात जन्म–मृत्युच्या फेऱ्या मारावयास लावायच्या.''

संत वजीदा त्यांच्या वाणीमध्ये लिहीतात की शाह सिकंदराला कुणीतरी सांगितले की, तुला जर **अमृत** पाजावयास मिळाले, तर तू अमर होशील. तू योद्धा आहेस, तू जगाचा विजेता बनशील आणि सकल सृष्टीवर राज्य करशील. त्यामुळे अमृताच्या शोधात सिकंदर रात्रं–दिवस घोड्यावर रपेट करीत राहिला. अखेरीस तो यशस्वी झाला, त्यास **अमृत** मिळाले.

काळाने विचार केला की, अगोदरच याने जगामध्ये खूप कहर माजवून ठेवला आहे. याने जर **अमृत** प्राशन केले, तर जगात तो आणखीन अत्याचार करेल. काळाने एका अशा मनुष्याचे रूप धारण केले की, त्याच्या शरीरातून पू आणि रक्त वाहत होते. त्याच्या शरीरास अनेक छिद्रे होती. काळ सिकंदरला म्हणाला,''हे बघ! माझ्या जवळ देखील कुणीतरी अमृताची स्तुती केली

होती की, अमृत खूप चांगले आहे. त्यामुळे मी अमृताचा शोध घेतला आणि ते प्यायल्यामुळे माझ्या शरीराची अशी अवस्था झाली. तू जर हे अमृत प्राशन केलेस, तर तुझीही अशीच अवस्था होईल. ''ते ऐकून सिकंदर राजाने त्याच्या हातातील अमृताचा प्याला सोडून दिला. संत वजीदा म्हणतात:

शाह सिकंदर ढूंढे आबे हयात नू। विच पहाड़ा फिरदा दिन ते रात नूं।
फेर न पीता प्याला अपने दस्त भर। वजीदा कौन कहे साहेब को इंज नहीं इंज कर।।

परमात्म्याने जर आपल्यावर कृपा दृष्टी केली नाही तर आपण केवळ विचारच करीत राहतो की, आपण शाकाहारी बनू, सत्संग ऐकू, मग सतगुरुंकडून नाम घेऊ. परंतु आपणांस कल्पनाही नाही की कधी मृत्यु आपणांस हाक देणार आहे? आपण आपली प्लानिंग करतो. परंतु परमात्म्याच्या प्लानिंगची आपणांस कल्पना नसते. परमात्म्याने आपल्यावर कृपा केली नाही, तर आपण अमृतापासून नामापासून वंचित राहतो.

नानक नामि रते सुखु पाइ आ दरगह जापहि सेई।।

गुरु नानकसाहेब आपणांस प्रेमाने समजावतात की, कोणास शांती लाभते? कोणास सुख लाभते? जे नामात एकरंग होऊन त्यात लीन होतात, तेच परमात्माच्या दरबारात जाऊ शकतात. गुरु रामदासजी सांगतात:

जिनि ऐसा हर नाम त चेतया से काहे जग आए।
ऐह मानस जन्म दुर्लभ है नाम बिना बिर था सब जाए।
हुण वत हर नाम न बीजया अग्गे भुखा क्या खाए।
मनमुखां नू फिर जन्म है नानक हर भाए।

आपले देखील कर्तव्य आहे की, गुरु साहेबांनी सांगितल्यानुसार शब्द–नामाची कमाई करावी, स्वत:चे जीवन सफल बनवावे. परमात्म्याने जो काही वेळ दिला आहे, त्याचा पुरेपूर फायदा करून घ्यावा.

***

परमात्मा प्रकाशरूप आहे

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींना सांगितलेली एक अविस्मरणिय घटना
संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान

मी परमार्थ प्राप्तीसाठी निरनिराळ्या ठिकाणी जाऊन अनेक लोकांना भेटलो. त्यांच्या सांगण्यावरून मी खूप कर्मकांडे करून पाहिली परंतु माझे मन संतुष्ट झाले नाही. प्रत्येक ठिकाणी लोकं फक्त परमेश्वराच्या गोष्टी करीत असत आणि अध्यात्मिक थियरी (सिद्धांत) समजावून सांगत असत, ज्यामुळे माझी तहान अजुनच वाढली, परंतु मला कोणीही अनुभव (साक्षात्कार) करवून देऊ शकला नाही. जर मला कोणत्याही ठिकाणाहून काहीही प्राप्त झाले असते तर मी बाबा बिशनदासजींकडे पोहोचलो नसतो.

जेव्हा मी बाबा बिशनदासजींच्या चरणी नतमस्तक झालो तेव्हा मला शांती लाभली. बाबा बिशनदासजींनी माझे जीवन घडवीले व माझ्या अध्यात्मिक मार्गाची सुरुवात करवून दिली. मी बाबा बिशनदासजींकडे सर्वप्रथम गेलो तेव्हा त्यांस म्हटले,''तुम्ही मला परमात्मा दाखवा!'' त्यांनी माझे तोंड सूर्याच्या दिशेला केले व म्हटले,''निरंतर सूर्याकडे पहात रहा आणि मला सांग, तू किती वेळ सूर्याकडे पाहू शकतोस?'' मी एक क्षणभर देखील सूर्याकडे पाहू शकलो नाही. मी लज्जास्पद स्थितीत त्यांना विचारले,''मी सूर्याकडे जास्त वेळ पाहू शकत नाही कारण सूर्यप्रकाशाची किरणे फार प्रखर आहेत.''

बाबा बिशनदासजी म्हणाले,''**परमात्मा प्रकाशरूप आहे**. परमात्म्याचा प्रकाश या सूर्याच्या प्रकाशापेक्षा हजारो पटीने जास्त आहे. आपण तर एका सूर्याचा प्रकाश देखील जास्त वेळ पाहू शकत नाही, तर मग त्या परमात्म्याच्या प्रकाशाकडे कसे पाहू शकू? जोपर्यंत आपण परमात्म्याचा प्रकाश पाहण्यास सक्षम असे नेत्र तयार करीत नाही, तोपर्यंत आपण गुरूंना परमात्मा दाखविण्याची विनंती कशी बरे करू शकतो?''

बाबा बिशनदासजी मला म्हणाले,''आपल्या आत्म्याचा बाह्यजगातील रीतिरिवाजांशी काहीही संबंध नसतो. (तीर्थक्षेत्रातील)पाण्यात अंघोळ केल्याने मुक्ती मिळत असती तर पाण्यात सदैव रहाणाऱ्या मासे–बेडूकांसारख्या जीवांना मुक्ती मिळाली असती. आगीच्या उष्म झोताजवळ बसल्यानेदेखील मुक्ती मिळत नाही कारण काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकाराची आग तर आपल्या अंतरात आधीपासूनच उपस्थित आहे.

मी जेव्हा पहिल्यांदा बाबा बिशनदासजींकडे गेलो होतो तेव्हा माझ्यासोबत दोन शेतकरी मित्र होते. बाबाजींनी आम्हांस शेतीचे काम सोपविले. त्याआधी मी कधी शेतीचे काम केले नव्हते. बाबा बिशनदासजींनी मला जसे सांगितले मी नेमके तसेच केले. माझ्यासोबत आलेल्या प्रेमींनी विचार केला की शेतीचे काम तर आपण यापूर्वी अनेकदा केलेले आहे, आता इथे येऊनही हेच काम करण्याचा काय फायदा? त्यांनी गुरूंच्या आज्ञेचे पालन केले नाही.

सायंकाळी बाबा बिशनदासजी हे पाहण्यासाठी आले की त्यांनी जे काम आम्हांस सोपविले होते ते आम्ही नीट केले की नाही? मी बाबा बिशनदासजींना विनंती करीत म्हटले,''मी घरी कधी शेतीचे काम अजुनपर्यंत केलेले नाही. तुमच्या चरणी येऊन तुमच्या कृपेनेच मी हे काम करू शकलो. माझ्याकडून हे काम करताना काही चूक झाली असेल तर मला माफ करावे.''

त्या दोन्ही प्रेमींनी बाबा बिशनदासजींपुढे एखादे निराळे काम सोपविण्याची विनंती केली की आम्ही जन्मापासूनच शेतीचे काम करीत आलो आहोत. त्यांना शेतीच्या कामात जरासुद्धा रुची नव्हती. बाबा बिशनदासजी त्यांच्यावर प्रसन्न झाले नाहीत, त्यामुळे त्यांनी त्या प्रेमींवर दया केली नाही. त्यांनी फक्त या गरीब आत्म्यावर दया केली.

बाबा बिशनदासजी अत्यंत कडक व शिस्तप्रिय महात्मा होते. त्यांचा जन्म पंजाबमधील नाभा संस्थानातील एका राजेशाही खानदानात झाला होता. त्यांच्या घरात सर्वप्रकारच्या सुखसोयी उपलब्ध होत्या. मी त्यांचा

खानदानी वाडा तसेच मालमत्ता पाहिलेली आहे. त्याकाळी भारतात राजे राज्य करीत असत. नाभा संस्थानाचा राजा हिरा सिंह बाबा बिशनदासजींना आपला उत्तराधीकारी बनवू इच्छित होता.

बाबा बिशनदासजी प्रापंचिक दृष्ट्या खूप शिकलेले विद्वान होते. त्याकाळी भारतात शिक्षण घेणे खूप कठीण असे. त्यांना शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले होते. त्यानी इंग्लंडमधुन पी.एच.डी. डिग्री प्राप्त केली होती. त्याकाळी भारतात पी.एच.डी. डिग्री प्राप्त करणे म्हणजे खूप मोठी गोष्ट मानली जात असे. जे इंग्लंडमधुन पी.एच.डी डिग्री प्राप्त करून येत असत, त्यांचा लोक खूप आदर–सत्कार करीत असत, सरकार त्यास कमिशनरचा हुद्दा देत असे. बाबा बिशनदासजी सांगत असत,''जास्त शिकले–वाचलेले लोक अंत:समयी आपल्या सोबत काहीही घेऊन जात नाहीत. अध्यात्मिक मार्गावर अशिक्षित आणि सुशिक्षित यांच्यात काहीही फरक नसतो.''

बाबा बिशनदासजी खूप आरामदायक जीवन व्यतीत करू शकले असते परंतु त्यांनी खूप कठोर जीवनाचा मार्ग निवडला. त्यांना आपल्या जीवनात परमात्मा प्राप्तीसाठी नाना प्रकारची कर्मकांडे केली. जेव्हा ते बाबा अमोलकदास यांच्या चरणी पोहचले, तेव्हा त्यांनी बाबा अमोलकदासजींना कोणताही प्रश्न विचारला नाही. ते बाबा अमोलकदासजीं समोर हात जोडून म्हणाले, ''गुरूजी, कृपया तुम्ही मला या नरकातून काढून मुक्त करा.''

बाबा अमोलकदास अशिक्षित होते, इथपर्यंत की ते आपली स्वाक्षरी देखील करू शकत नव्हते. जेव्हा बाबा बिशनदासजी बाबा अमोलकदासजींकडे गेले तेव्हा बाबा अमोलकदासांनी त्यांना वाळवंटातून काटेरी झुडूपे आणून एका अशा जागी कुंपण बनविण्यास सांगितले जी जागा त्यांची स्वत:ची नव्हती. ती नापीक जमिन असल्याने तेथे कोणत्याही पिकाची पेरणी केली जाऊ शकत नव्हती की ज्याकरीता तेथे कुंपण लावण्याची गरज भासावी. बाबा अमोलकदासजींच्या आदेशानुसार बाबा बिशनदासजी दिड महिना

वाळवंटातून काटेरी झुडूपे आणून कुंपण बांधीत राहिले. तसे केल्यानंतरच बाबा अमोलकदासांनी बाबा बिशनदासजींना दोन शब्दांचे नामदान दिले आणि त्यांच्याकरवी ध्यान–अभ्यास करवून घेतला.

बाबा अमोलकदासांनी गुरू नानकदेवजींचे पुत्र श्रीचंदांकडून दोन शब्दांचे नामदान प्राप्त केले होते. गुरू नानकदेवजी स्वयंसिद्ध परमात्मा होते. ते याजगात लोकांना परमात्म्याविषयक ज्ञान देण्यासाठी आले होते. जगातील अनेक लोकांनी आपल्यापासून लाभही घेतला, परंतु आपल्या श्रीचंद आणि लक्ष्मीदास नामक दोन्ही मुलांनी आपल्याकडून पाच शब्दांचे नामदान घेतले नाही. लक्ष्मीदास मांसाहार तसेच अनेक प्रकारची दुष्कर्मं करीत असे.

श्रीचंदाने उदासी मतातील अविनाशी मुनींकडून दोन शब्दांचे नामदान घेतले. अविनाशी मुनींनी श्रीचंदास शरीरावर केवळ लंगोट घालून नदीच्या काठावर बसून तप करण्याचा आदेश दिला. श्रीचंदाने नाना प्रकारची कर्मंकांडे केली. श्रीचंदाची गादी ही भारतातील एक प्रसिद्ध गादी मानली जाते. श्रीचंद दोन शब्दांचे नामदान देऊ लागला. उदासी मतातील लोक श्रीचंदास शंकराचा अवतार मानतात.

गुरू नानकदेवजींनी भाई लैहणास नामदान दिले. ध्यान–अभ्यासात परिपूर्ण प्रगती प्राप्त केल्यानंतर गुरू नानकदेवजींनी भाई लैहणास (ज्यांचे नाव पुढे गुरू अंगददेवजी ठेवले) आपला उत्तराधिकारी बनविले. परिपूर्ण गुरूंना माहित असते की पुढे काय होणार आहे. गुरू नानकदेवजींना ठाऊक होते की त्यांनी देहत्याग केल्यानंतर त्यांची मुले (श्रीचंद आणि लक्ष्मीदास) भाई लैहणाचा सन्मान करणार नाहीत, कारण त्यांचे कुटुंबिय आणि आजुबाजुचे लोकही भाई लैहणास गुरू नानकदेवजींच्या घरचा नोकरच समजत असत.

गुरू नानकदेवजींनी देहत्याग करण्याच्या काही महिन्यांपूर्वी भाई लैहणास त्यांच्यापासून दूर जाण्याची आज्ञा दिली, जेणेकरून त्यांच्यापश्च्यात त्यांच्या मुलांनी व भावांनी भाई लैहणास त्रास देऊ नये. भाई लैहंणांनी आपल्या गावी

जाऊन स्वत:स एका खोलीत बंद करून ध्यान–अभ्यास करण्यास सुरुवात केली आणि अंतर्यात गुरू नानकदेवजींशी एकरंग झाले.

जेव्हा गुरू नानकदेवजींनी आपली सांसारिक यात्रा पूर्ण केली व आपला देहत्याग केला तरीदेखील त्यांची मुले त्यांच्याजवळ आली नाहीत व आपल्या तिरडीला खांदा दिला नाही. त्यांची मुले त्यांच्यावर नाराज होती कारण त्यांनी दोन्ही मुलांना गुरूगादी दिली नाही. श्रीचंद आणि लक्ष्मीदास दोघेही म्हणत असत की भाई लैहणा आमच्या घरचा नोकर आहे, आम्ही त्यास आपला गुरू कसे मानू? भाई लैहणा गुरू नानकदेवजींचे उत्तराधिकारी बनले परंतु गुरू नानकदेवजींच्या मुलांनी त्यांस सच्चे गुरू म्हणून स्वीकार केला नाही. श्रीचंदाने गुरू नानकदेवजींच्या समांतर आपला स्वत:चा पंथ सुरु केला आणि दोन शब्दांचे नाम देऊ लागला.

युगायुगांपासूनच असे होत आलेले आहे की काही लोकं परिपूर्ण गुरूंच्या उत्तराधिकाऱ्यास मानतात तर काही मानत नाहीत. ज्यांच्या भाग्यात दैव लिखीत असते केवळ तेच परिपूर्ण गुरूंच्या उत्तराधिकारीच्या चरणी पोहचतात.

श्रीचंदाने दिर्घायुष्य उपभोगले. जेव्हा तो गुरू रामदासजींना भेटला, तेव्हा तो त्यांस म्हणाला,''तुम्ही इतकी लांब दाढी का वाढवलेली आहे?'' ते म्हणाले, ''ही दाढी आपल्यासारख्या महापुरूषांचे चरण साफ करण्यासाठी वाढवलेली आहे.'' गुरू रामदासजींचे नम्रतेने ओतप्रोत उत्तर ऐकून श्रीचंदाच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. तो म्हणाला,''तुमच्या या नम्रतेमुळेच आम्हांस ही गादी मिळाली नाही. आमच्याकडे काहीही शिल्लक राहिले नाही.''

बाबा अमोलकदास खूप चांगले साधू होते. त्यांनी जवळजवळ एकशे चाळीस वर्षांचे दिर्घायुष्य व्यतीत केले. बाबा अमोलकदासांनी केवळ बाबा बिशनदास आणि पटियालाच्या राजा भूपेंद्र सिंहास नाम दिले. मी जेव्हा बाबा बिशनदासजींच्या चरणी पोहचलो तेव्हा बाबा अमोलकदास देहरुपात होते.

***



कुणाचे नाव कायम राहते?

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू नानकदेवजी महाराजांची वाणी
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान

एक वेळ अशी होती की, जगात एकही जीव अस्तित्वात नव्हता. पशु, पक्षी, मनुष्य, राक्षस, पर्वत काहीच अस्तित्वात नव्हते. परमात्म्यास वाटले की, मी एकापासून अनेकांमध्ये रूपांतरीत व्हावे. म्हणून परमात्म्याने समुद्र, पर्वत, खंड–ब्रह्मांड या सर्वांची रचना केली. गुरू नानकदेवजी सांगतात:

एका कवाओ तिसते होवे लख दरियाओ।

केवळ एवढे म्हणताच सर्व विश्वाची रचना झाली. तो देवांमध्ये देव बनून आला. स्वत:चा प्रकाश इतरांना देण्यासाठी तो मनुष्यांमध्ये मनुष्य बनून आला, कारण मनुष्याचा शिक्षक मनुष्यच होऊ शकतो. तो जर देव किंवा अवतार बनून आला असता तर आपण त्यास पाहू शकलो नसतो, जर तो पशूच्या योनीत आला असता तर आपण त्याची भाषा समजू शकलो नसतो. म्हणून तो असे शरीर धारण करून आला, ज्यास आपण पाहू शकू आणि ज्याने बोललेले आपण सहज समजू शकू.

परमात्म्याने त्याच्या रचनेचे ज्ञान इतरांना देण्यासाठी परिपूर्ण मनुष्यास या जगात रवाना केले. असा मनुष्य परमात्म्याचा प्रिय असतो, परमात्मारूपी असतो. त्याने आत्मा आणि परमात्म्याचा शोध घेऊन स्वत:स परमात्म्यामध्ये समरस केलेले असते. तो केवळ स्वत:च्या नजरेने पाहिलेलेल्या व अनुभवलेल्या गोष्टीच वर्णन करून सांगत असतो. एक अभ्यासी मनुष्यच तुमच्याकडून अभ्यास करवून घेऊ शकतो. जसे एखादा पैलवानच पैलवानी शिकवू शकतो, तसे ज्याने स्वत: परमात्म्यास पाहिलेले असते तोच तुम्हास परमात्मा दाखवू शकतो. कबीर साहेब सांगतात:

गुरू बेचारा क्या करे जे सिक्खन में चूक। अंधे एक ना लग्गी ज्यों बाँस बजाई फूँक।।

मी अगोदरही अनेकदा ही गोष्ट सांगितली आहे की, एक राजा जंगलात शिकार करण्यासाठी गेला असता, तो मार्ग विसरला. तहानेने तो इतका व्याकूळ झाला की पाणी मिळाले नाही तर प्राण निघून जातील. तेथे एक गरीब लाकूडतोड्या लाकडे तोडत होता, जो लाकडे विकून त्याचा उदरनिर्वाह करीत असे. त्याने राजास प्यावयास पाणी दिले, त्यामुळे राजाचे प्राण वाचले. राजा त्या लाकूडतोड्यावर खूष झाला. राजा त्यास म्हणाला,''तुला जर कोणत्याही गोष्टीची गरज भासली, तर तू माझ्याकडे ये.''

काही दिवसांनंतर तो गरीब लाकूडतोड्या राजाकडे गेला आणि स्वत:च्या गरीबीचा वृत्तांत त्याने वर्णन केला. राजाने विचार केला! याने माझे मौल्यवान प्राण वाचविले आहेत, त्यामुळे यासदेखील आपण काहीतरी मौल्यवान वस्तू द्यावी. राजाने त्यास शहराजवळील एक चंदनाची बाग दिली, जेणेकरून मौल्यवान चंदनाची लाकडे विकून त्याने सुखी जीवन व्यतीत करावे. चंदनाची बाग मिळाली तरी तो लाकूडतोड्या आनंदीत झाला नाही, कारण त्याची अपेक्षा होती की राजाने त्यास धन–संपत्ती द्यावी. लाकूडतोड्या चंदनाच्या लाकडांचा कोळसा करून विकत राहीला.

एकदा राजा त्या बाजूने जात होता. त्याने विचार केला की, आपले प्राण वाचविणारा लाकूडतोड्या आता खूप श्रीमंत बनला असेल. आपण त्यास भेटून जावे. राजाने पाहिले की, त्या लाकूडतोड्याच्या हातामध्ये तशाच तऱ्हेने कुऱ्हाड होती व त्याने फाटके कपडे परिधान केलेले होते.

ते पाहून राजास खूप वाईट वाटले. तो त्या लाकूडतोड्यास म्हणाला, ''हे मित्रा! मी तुला अतिशय मौल्यवान वस्तू दिली होती. त्यापैकी काही उरलेले आहे काय?'' त्या लाकूडतोड्याकडे चंदनाची एक काठी उरलेली होती. राजाने जेव्हा त्या उरलेल्या काठीचे मूल्य शेकडो रुपये दिले तेव्हा त्यास पश्चात्ताप झाला. ही लाकडे इतकी मौल्यवान आहेत, हे जर मला माहित असते, तर मी त्यांचा वापर अतिशय विचारपूर्वक केला असता.

महात्मा आपणांस समजावतात की, हे जग एक जंगल आहे. तो राजा म्हणजे परमात्मा आहे. आपली शुभ कर्मे पाहून परमात्मा आपल्यावर दया करतो व मनुष्य देहरूपी चंदनाची बाग आपणांस बक्षिस म्हणून देतो. परंतु आपणांस या देहाची कदर नाही. ज्याप्रमाणे चंदनाची लाकडे जाळून त्यांचे कोळसे लाकूडतोड्याने केले, त्याचप्रमाणे आपण विषय-विकारांमध्ये हा देह वाया घालवितो. जेव्हा हा मनुष्य जन्म आपल्या हातून निसटतो तेव्हा आपण खूप पस्तावतो की, आपणांस याजन्मात नामस्मरण करावयास हवे होते.

अब पछताए क्या होत है, जब चिड़िया चुग गई खेत।

महाराज सावन सिंहजी बायबलमधील एक गोष्ट नेहमी सांगत असत. एक मालक काही विशेष कामासाठी बाहेरगावी जात होता. त्याने त्याच्या नोकरांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपविल्या. त्याने पहिल्या नोकरास बरेच रुपये देत सांगितले की,''या पैशांनी व्यापार कर.'' दुसऱ्या नोकरासही खूप रुपये देऊन कारभार करण्यास सांगितले, परंतु त्याने तिसऱ्या नोकरास मात्र थोडे कमी पैसे दिले आणि तो स्वत: कामासाठी बाहेरगावी निघून गेला.

पहिल्या नोकराने मालकाने दिलेल्या पैशांनी खूप मेहनतीने धंदा केला. दुसऱ्या नोकरानेदेखील मेहनत करून मालकाने दिलेली रक्कम दुप्पट केली. परंतु तिसऱ्या नोकराने त्यास मिळालेली रक्कम घरामध्ये जपून ठेवली. घरी परतल्यावर तो मालक पहिल्या दोन नोकरांवर प्रसन्न झाला, कारण त्यांनी त्याच्या आज्ञेचे पालन केले होते. त्या दोघा नोकरांना आणखीन अधिकार देत त्याने सांगितले, ''मी तुमच्यावर खूप प्रसन्न आहे.'' तिसऱ्या नोकराने त्यास मिळालेली रक्कम जशीच्या तशी मालकास परत केली. ते पाहून नाराज होत मालक म्हणाला, ''मी तुझ्यावर प्रसन्न नाही.''

महात्मा अशा कथेद्वारे आपणांस समजावतात की, तो मालक परमात्मा असून त्याने नोकरांना दिलेली रक्कम म्हणजे आपणांस मिळालेला मनुष्य जन्म आहे. जो या मनुष्य जन्मामध्ये बसून प्रभु-भक्ती करतो, तेव्हा ते

पाहून प्रभु प्रसन्न होऊन त्यांच्यासाठी स्वगृहाचे द्वार उघडतो, त्यांना शाबासकी देतो. मात्र मनुष्यजन्म मिळूनही जी लोकं परमेश्वराची भक्ती करीत नाहीत, त्यांच्यावर परमात्मा प्रसन्न होत नाही. गुरु नानकदेवजी महाराज सांगतात:

ईकनी लाहा लै चल्ले ई चल्ले भूल गँवाए।

सच तेरे खंड सचे ब्रहमंड।। सचे तेरे लोअ सचे आकार।।

शेख बरमने गुरु नानकदेवजींना विचारले की,''या जगात कोणती वस्तू सत्य आहे? खरे बोलणे म्हणजे सत्य आहे का?'' गुरु नानकदेवजी उत्तर देतात की सत्य बोलणे चांगले असून तो सतोगुणाचा परिणाम आहे. परंतु संत त्या शक्तीस सत्य असे संबोधतात की, जी कधीच नष्ट होत नाही. त्या शक्तीने खंड, ब्रह्मांड आणि जीवांच्या देहाची रचना केलेली आहे. तो स्वत: त्या सर्वांमध्ये सामावलेला आहे. आपण सांगता:

खंड पाताल द्वीप सब लोआ, सब काले बस आप प्रभु कीआ।
त्रेहा गुणां ते रहे निरारा, सो गुरुमुख सोभा पाईन्दा।।

आपण स्वत:हून खंड ब्रह्मांड ओळखू शकत नव्हतो आणि आपणांस परमात्म्याचे ज्ञानही नव्हते. परमात्म्याने त्याच्या प्रियजनांना आपल्याकडे पाठवून त्याच्याबद्दलचे ज्ञान आपणांस दिले.

सचे तेरे करणे सरब बीचार।। सचा तेरा अमरु सचा दीबाणु।।
सचा तेरा हुकमु सचा फुरमाणु।। सचा तेरा करमु सचा निसाणु।।

आता परमात्म्याचे गुणगान करीत गुरू नानकदेवजी सांगतात,''हे परमात्मा तुझा दरबार सच्चा आहे. ज्याच्यासाठी तू तुझ्या दरबाराचे द्वार एकदा का उघडतोस, त्यास तू पुन्हा दूर करीत नाहीस. या जगात कुणाला ठेवायचे, कुणाला नाम द्यायचे, कुणाची स्वत:शी भेट करवून द्यायची हे निर्णय तुझेच असतात. कुणास हुकूमनामा द्यावा हा तुझा निर्णयदेखील सच्चा आहे.''

सचे तुधु आखहि लख करोड़ि।। सचै सभि ताणि सचै सभि जोरि।।



आपण प्रेमाने सांगत आहात की, जे तुझी स्तुती करतात, तुझे नामस्मरण करतात, तुझ्याशी एकरंग होतात, ते देखील सच्चे बनतात. त्यांचा कधीच नाश होत नाही. एकदा गुरु नानकदेवजींना काही प्रेमींनी विचारले की, या जगात **कुणाचे नाव कायम राहते?** कुणी म्हणाले, ''जो धर्मशाळा बनवून देतो त्याचे नाव कायम रहाते.'' कुणी म्हणाले,''जो मंदिर बनवून देतो त्याचे नाव कायम रहाते.'' कुणी म्हणाले, ''मुले जन्मास घातल्याने नाव कायम रहाते.'' परंतु या उत्तरांनी त्यांचे समाधान झाले नाही. ते म्हणाले:

नाम रहयो साधु रहयो रहयो गुरु गोविन्द।
कहो नानक इस जगत में जिन जपया गुरु मंत्र।।

या जगात परमात्म्याचे किंवा त्या साधुचे नाव कायम राहील, जो परमात्म्याच्या तर्फे या जगात आलेला आहे. जी लोकं त्या साधुकडून शब्द–नाम प्राप्त करून घेऊन त्याची कमाई करतात, तेदेखील परमात्मारूप बनतात. कारण परमात्म्याचे वास्तव्य कायमस्वरूपी आहे.

सची तेरी सिफति सची सालाह।। सची तेरी कुदरति सचे पातिसाह।।

आपण सांगता की, तुझी स्तुती करणे एक सच्चे कार्य आहे. ज्याने तुझी स्तुती केली, त्याचा कधीही विनाश होत नाही. तू दिलेला सल्ला, तुझी शक्ती सच्ची व वास्तव आहे, जे कधी नाश पावत नाही. तुम्ही असे काही उपाय करा, ज्यायोगे तुम्ही गुरू परमात्म्याची स्तुती करू शकाल, त्याच्यावर प्रेम करू शकाल.

नानक सचु धिआइनि सचु।। जो मरि जंमे सु कचु निकचु।।

परमात्म्याची भक्ती करून जे लोक परमात्म्यात समरस होतात, तेदेखील सच्चे बनतात. ज्यांच्या अंतर्यात नामाचा रस निर्माण होतो, भक्तीचे ज्ञान प्राप्त होते, त्यांचा विश्वास कधीच डळमळीत होत नाही. जे परमात्म्याची भक्ती करीत नाहीत, ते कच्चे राहतात व जन्ममृत्युच्या चक्रनेमिक्रमात सापडतात.

अशी माणसे इतरांचे अनुकरण करीत संतांच्या संगतीत जरी आले तरी त्यांचा परमात्म्यावरील विश्वास डळमळीतच राहतो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''ज्याने स्वत:च्या नेत्रांनी पाहिले की, हा घोडा आहे, मग सर्व जगाने एका बाजूस होऊन म्हटले की, ते गाढव आहे, तरी तो मनुष्य ते मान्य करीत नाही.''

माझ्या आत्म्याचे परमात्मा, शब्दरूपी कृपाल नेहमी हेच म्हणत असत की, हा देह कायमचा राहणारा नसून, संतांच्या अंतरात जी शक्ती कार्यरत आहे, ती कायमस्वरूपी राहणारी आहे. त्यांनी जेव्हा या जगातून देहत्याग केला, तेव्हा अनेकजण न्यायालयापर्यंत गेले. ते सर्वजण म्हणाले की कृपालजी मृत्यु पावले. परंतु मी ठामपणे हेच म्हटले, ''जे लोक असे म्हणत आहेत की गुरु मृत्यु पावले, त्यांना न्यायालयात उभे करा. कारण 'शब्दरूपी' गुरु कधी मरत नाहीत. ते कायमस्वरूपी असतात. ज्यांचे गुरु स्वत:च जन्म-मरणाच्या चक्रनेमिक्रमात अडकून पडले आहेत, त्यांच्या शिष्यांचा जन्म-मृत्युच्या चक्रनेमिक्रमातून कसा बचाव होऊ शकेल?''

या जगामध्ये सतगुरुंचे कायमस्वरूपी वास्तव्य असते. ते ये-जा करीत नाही. ते कधी स्वत:च्या देहाच्या बंधनात इतरांना गुंतवून ठेवत नाहीत. जोपर्यंत त्यांना परमात्म्याचा आदेश असतो तोपर्यंत ते देह धारण करून आत्म्यांना परमात्म्याशी शब्द-नामाशी जोडतात. गुरु नानकदेवजी सांगतात:

सतगुरु मेरा सदा सदा, ना आए ना जाए। वो अविनाशी पुरुष है, हर जेहा रहा समाए।।

हुजूर महाराज सांगत असत की जर एखादा बल्ब खराब झाल्यास त्याच्या जागी दुसरा बल्ब लावला जातो. त्यामुळे प्रकाशात काहीच फरक पडत नाही. गुरु ग्रंथसाहेबमध्ये राय बलबंडे यांच्या वाणीमध्ये लिहिले आहे की, ज्योत एकच आहे, केवळ शरीर बदलते.

वडी वडिआई जा वडा नाउ।। वडी वडिआई जा सचु निआउ।।

गुरु नानकदेवजी महाराज परमात्म्याचा महिमा वर्णन करताना सांगतात की, तो विश्वाच्या कणा-कणांमध्ये सामावलेला आहे. त्याचे नाम सर्वश्रेष्ठ असून ते कधीच नाश पावत नाही. त्याचा न्याय सर्वोच्च असून, त्याचा न्याय सच्चा आहे. त्याचे जर कुणी स्मरण केले, तर त्याचे फळ तो त्या व्यक्तीस अवश्य देतो. परमात्म्यास कुणी शिव्या जरी दिल्या, तरीही तो नाराज होत नाही. तो त्याच्या मदतीचा हात सदैव पुढे करतो. परंतु प्रत्येकास त्याच्या स्वकर्माचे फळ भोगावेच लागते.

वडी वडिआई जो निहचल थाउ।। वडी वडिआई जाणै आलाउ।।

परमात्म्याचे मोठेपण यामध्ये आहे की, ॐ पर्यंतची सृष्टी प्रलयामध्ये वाहून जाते. महाप्रलयामध्ये भँवर गुफेच्या वरील मंडळे वाहून जातात. सचखंड मात्र निश्चल असून त्याचा कधीच विनाश होत नाही.

वडी वडिआई बुझै सभि भाउ।। वडी वडिआई जा पुछि न दाति।।

सर्वात अधिक परमात्म्याचे मोठेपण यामध्ये आहे की, ज्याच्या अंतर्यात तो नाम प्रकट करतो, त्यास तो नाम देण्याचा अधिकार देतो. मग त्यास तो विचारत नाही की, तू इतक्या लोकांना नामाशी का जोडतोस?

सौंपे जिस भंडार फिर पुछ ना लीतियन।

वडी वडिआई जा पुछि न दाति।। वडी वडिआई जा आपे आपि।।

आपण सांगत आहात की, परमात्मा कुणाच्या सल्ल्याने दान देत नाही. त्याचा कोणी निदर्शक वा प्रतिनिधी नाही. त्याच्या समान कुणीच नाही. त्याचे उदाहरण तो स्वत: परमात्माच आहे.

नानक कार न कथनी जाइ।। कीता करणा सरब रजाइ।।

आपण सांगत आहात, ''आपण त्याच्या महिमेचे वर्णन आपल्या जिव्हेने करू शकत नाही. अंतर्यात जाऊन परमात्म्यास प्राप्त करूनच आपण त्याचे अंतरंग जाणून घेऊ शकतो.''

इहू जगु सचै की है कोठड़ी सचे का विचि वासु।।
इकन्हा हुकमि समाइ लए इकन्हा हुकमे करे विणासु।।

गुरु अंगददेवजींची ही वाणी आहे. आपण सांगत आहात की, प्रियजनहो, हे शरीर परमात्म्याच्या वास्तव्याचे ठिकाण आहे. गुरु अमरदेवजींनी यास हरी–मंदिर असे संबोधले आहे. कुणा महात्म्याने यास चर्च, गुरुद्वारा, मंदिर आणि मस्जिद म्हटले आहे. या गृहात परमात्मा स्वत: बसलेला आहे. कुणाची आपल्याशी गाठ घडवून द्यायची आणि कुणाला मायेचस्या पदार्थांमध्ये अडकवायचे हा निर्णयदेखील त्याचाच असतो.

इकन्हा भाणै कढि लए इकन्हा माइआ विचि निवासु।।
एव भि आखि न जापई जि किसै आणे रासि।।
नानक गुरमुखि जाणीऐ जा कउ आपि करे परगासु।।

गुरु नानकदेवजी असा अहंकार करीत नाहीत की खंड–ब्रह्मांडाचे वा परमात्म्याचे ज्ञान केवळ मलाच आहे. ते सांगतात,''गुरुंच्या शिकवणीवर जे अमल करतात ते गुरूमुख असतात. जे गुरु बोलतात तेच गुरुमुख बोलतात.''

मी नेहमी सांगतो की, जे मनुष्य संतमताच्या शिकवणुकीनुसार मार्गक्रमण करतात, स्वत:च्या अंतर्यात प्रकाश प्रकट करून स्वगृही सचखंडास पोहचतात, गुरूंना स्वत:च्या अंतर्यात प्रगट करतात, तेच गुरुमुख शिष्य परमात्म्याचे रहस्य जाणतात की, ज्या परमात्म्याचा शोध ते घेत असतात, तो परमात्मा आपल्या देहात, आपल्या अंतर्यात सामावलेला आहे. ज्यांना हे रहस्य उलगडले नाही ते केवळ शाब्दिक पैलवान बनले आहेत. ते केवळ शाब्दिक कुस्त्याच खेळत राहतात.

नानक जीअ उपाइ कै लिखि नावै धरमु बहालिआ।।
ओथै सचे है सचि निबड़ै चुणि वखि कढे जजमालिआ।।

गुरु नानकदेवजी महाराज सांगतात, परमात्म्याने जीवांना जन्म देऊन त्यांना निराधार सोडून दिले नाही. जगाची मर्यादा कायम राखण्यासाठी त्याने धर्मराजाची नेमणूक केली आहे. जो जसे कर्म करतो, त्यास त्यानुसार बक्षिस वा सजा मिळते. जीवास त्याच्या मर्जीनुसार कर्म करण्याची मुभा आहे. परंतु धर्मराजाकडे पोहचल्यावर सच्चे एका बाजूस तर खोटे एका बाजूस विभागले जातात. खोट्यांना परमात्म्याच्या दरबारात दाखल केले जात नाही.

थाउ न पाइनि कूड़िआर मुह काल्है दोजकि चालिआ।।
तेरै नाइ रते से जिणि गए हारि गए सि ठगण वालिआ।।
लिखि नावै धरमु बहालिआ।। लिखि नावै धरमु बहालिआ।।

आजकाल तर अनेक प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध आहेत. कागदांच्या नोटा, डॉलर वगैरे चलन बनविलेले आहे. पूर्वी चांदीच्या नाण्यांचे चलन असे. चांदीची नाणी घेऊन जेव्हा कुणी खजिनदाराकडे जात असे, तेव्हा तो त्या नाण्यांची बारकाईने पडताळणी करीत असे. ज्या नाण्यात इतर प्रकारचा धातू मिश्रित केलेला असे, त्या नाण्यावर निशाणी करून त्यास एके बाजूस ठेवत असे. मग ते नाणे कोठेही चलन म्हणून वापरले जात नसे.

आपलीदेखील अशीच अवस्था आहे की, प्रत्येक जन्मानंतर आपल्या आत्म्याची तपासणी धर्मराज करतो. ज्यांची कर्मे वाईट असतात, त्यांचे मुख काळे केले जाते, जेणेकरून इतरांच्याही लक्षात यावे की, याची रवानगी नरकात केली जाणार आहे. धर्मराजाची कुणाबरोबरही मैत्री वा वैर नसते. ज्याचे जसे कर्म असते त्यानुसार त्याचा अहवाल धर्मराज बनवितो. गुरु नानकदेवजी म्हणतात :

खरे परम खज़ाने पाए, खोटे भ्रम भुलावणया।

***

अमृतवेळ

परमसंत अजायब सिंह महाराजांनी ध्यान-अभ्यासात बसविण्यापूर्वी संगतला दिलेला संदेश - मुंबई, महाराष्ट्र - १८ जानेवारी, १९८६

बंधूंनो, आपला आत्मा त्या परमात्म्याचा अंश आहे. तो आपल्या खऱ्या घरास विसरून मनाचा दास बनलेला आहे आणि मन-इंद्रियांचा गुलाम बनलेला आहे. काळाने पाच डाकू - काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार प्रत्येक आत्म्याच्या मागे लावलेले आहेत. आत्म्यास काम, क्रोध, लोभ, मोह

आणि अहंकार यांचा कोणता ना कोणता रोग लागलेला आहे. आत्मा त्या रोगांनी ग्रासलेला आहे आणि आपले मन दिशाभूल होऊन फिरत आहे.

मनासारखा दुसरा कोणताही निष्टावान मित्र नाही आणि मनासारखा दुसरा कावेबाज शत्रूदेखील नाही. दिशाभूल झालेले मन विध्वंस करते. जर आपण मनास योग्यमार्गी लावले तर ते आश्चर्यजनक कार्यदेखील करते.

या रोग आणि त्रासापासून स्वत:चा बचाव करायचा असेल तर एखाद्या परिपूर्ण महात्मांच्या शरणी जाऊन शब्द–नामाची कमाई करण्याखेरीज इतर कोणताही उपाय नाही. आपण जेव्हा शब्द–नामाची कमाई करतो तेव्हा हे बाह्यजगातील गोष्टींमध्ये भरकटलेले मन एकाग्र होऊन आपल्या घरी जाऊन पोहचते आणि एकाजागी तृप्तपणे बसते.

मी नेहमी हे उदाहरण देतो की एक वेडा मनुष्य बाहेर पळून तोडफोड करतो, त्यातच तो आनंद मानतो. जर का एखाद्या समंजस मनुष्याने त्यास समजावून योग्य औषध दिले, ज्याने तो बरा झाला तर तोच वेडा मनुष्य एका जागी शांतपणे बसतो आणि ज्याने त्याचा इलाज केलेला असतो त्यास तो आपला खरा मित्र मानून त्याचा सदैव धन्यवाद करतो.

आपल्या मनाची देखील हीच परिस्थिती आहे. जेव्हा आपण संत–महात्मांनी दिलेले नामरुपी औषध प्राप्त करून त्याचा डोस आपल्या मनास देऊ लागतो तेव्हा आपले भरकटलेले वेडे मन एकाजागी शांत होते मग तेच वेडावलेले मन अंतर्यात जाण्यात आपली मदत करते.

मनास शांत करा, शांत मनच ध्यान–अभ्यास करू शकते. ध्यान–अभ्यासास कधी ओझे समजू नका, तो प्रेमाने करा. बाहेर होणाऱ्या कोणत्याही आवाजाकडे लक्ष देऊ नका. मनास बाह्यजगातील विचारांच्या तरंगात भटकू देऊ नका, चित्त तिसऱ्या तिळावर एकाग्र करा.

***

वाण्याचा मुलगा

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींना सांगितलेली एक बोधकथा
संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान



एक वाणी (किराणा जिनसांचा दुकानदार) नित्यनेमाने सत्संगात जात असे. एके दिवशी त्यास काही खास कामासाठी जावे लागले, म्हणून त्याने आपल्या मुलास सांगितले की, ''मुला, आज तू सत्संगास जा.'' त्याचा मुलगा सत्संगात गेला. महात्मा सत्संगात सांगत होते की,''गाय, गरीब व साधुवर दया केली पाहिजे.'' तो मुलगा जेव्हा घरी परतला तेव्हा त्याने पाहिले की गाय दुकानातील गोणीतून पीठ खात होती. त्याने विचार केला की आपणांस खूप घरभाडे मिळते, व्याजाची कमाई देखील भरपूर येते तर मग या गाईने दोन किलो पीठ खाल्ले तर त्याने काय फरक पडेल?

त्याचे वडील परतले व त्यांनी मुलास म्हटले,''अरे आंधळ्या, तुला दिसत नाही की गाय पीठ खात आहे?'' मुलगा म्हणाला,''बाबा, परमात्म्याने आपल्या पदरी खूप धन दिलेले आहे, जर या गाईने थोडेसे पीठ खाल्ले तर आपणांस काय फरक पडेल?'' त्याने वडिलांचे विरोधात्मक अपशब्द सहन केले परंतु गाईला पीठ खाण्यापासून रोखले नाही. वाणी म्हणाला,''मी गेली तीस वर्षे सत्संगात नित्यनेमाने जातो. जर मी अशा शिकवणीवर अंमल केला असता, तर आतापर्यंत आपले दिवाळे वाजले असते. तू घरातून चालता हो.'' वाण्याचा मुलगा घर सोडून निघाला.

बाहेर गेल्यावर त्याने पाहिले की एका सापाच्या जबड्यात सापडलेला बेडूक जीव वाचविण्यासाठी ओरडत होता. वाण्याच्या मुलाने त्या बेडकास सापाच्या जबड्यातून वाचविले. सापास भूकेने व्याकूळ पाहून त्याने आपल्या जांगेतील मांस कापून काढून सापास खाण्यासाठी दिले आणि पुढे चालू लागला. त्यास खूप वेदना होत होती, त्याच्याकडून चालवले जात नव्हते.

पुढे गेल्यावर वाण्याच्या मुलास एक वयोवृद्ध महिला भेटली, जिच्या सोबत एक छोटे मुल होते. ती खूप त्रस्त होती. तिने वाण्याच्या मुलास म्हटले,''जर तू माझे हे गाठोडे उचललेस तर मी तुझे खूप आभार मानेन.'' वाण्याचा मुलगा सद्‌गुणी होता, त्याने तिचे गाठोडे डोक्यावर उचलले. जेव्हा ते तिघे थोड्या अंतरावर गेले असता त्यांनी समोरून एका मनुष्यास घोडा घेऊन येताना पाहिले. ती महिला म्हणाली,''हे बघ मुला, माझ्याकडे खूप धन आहे. तू त्या घोड्यास विकत घे, आपण घोड्यावर बसून पुढे जाऊ.''

घोडा विकत घेऊन त्यावर बसून ते तिघे पुढे गेले. वाटेत त्यांनी एका जागी रात्र काढली आणि शेवटी ते एका नगरात पोहचले. त्या नगराच्या राजाकडे ते नोकरी करू लागले. राजाकडे एक चमत्कारी अंगठी होती. त्या अंगठीस राजा सदैव आपल्या जवळच ठेवत असे. त्या अंगठीमुळे स्वर्गातील पऱ्या राजास सिंहासनावर बसवून सहलीसाठी घेऊन जात असत.

एके दिवशी राजा त्या वयोवृद्ध महिलेच्या मुलास घेऊन सहलीसाठी गेला असता राजाची अंगठी समुद्रात पडली. राजा खूप भयभीत झाला की अंगठी नसेल तर पऱ्या येणार नाहीत, माझे सिंहासन उचलून मला सहल कोण करवेल? राजाने घोषणा केली की,''जर कोणी समुद्रातून माझी अंगठी शोधून आणून दिली तर मी त्यास हवे ते देण्यास तयार आहे.''

त्या महिलेच्या मुलाने राजास म्हटले की,''जर तुम्ही तुमच्या राजकन्येचे लग्न माझ्या मोठ्या भावाशी करवून देण्यास तयार असाल तर मी तुमची अंगठी समुद्रातून आणून देईन.'' राजाने त्वरीत होकार दिला. त्याने समुद्रात बुडी मारली व अंगठी आणून राजासमोर ठेवली. राजाने आपल्या राजकन्येचा विवाह त्याच्या मोठ्या भावाशी (वाण्याच्या मुलाशी) करवून दिला. राजास दुसरे अपत्य नसल्याने राजाने आपले राज्यदेखील जावयास दिले.

काही दिवसांनी ती महिला म्हणाली,''चला आपण आपापल्या घरी परत जाऊया.'' वाटेत त्या महिलेच्या मुलाने वाण्याच्या मुलास म्हटले,''तू मला ओळखलेस का? मी तोच बेडूक आहे ज्याची तू सापाच्या जबड्यातून सुटका केलीस.'' मी तुझा भाऊ बनून तुझे लग्न राजकन्येशी करवून दिले. राजाने तुझा राज्याभिषेक करविला. अशातऱ्हेने मी तुझ्या कर्जाची परतफेड केली.'' थोडे अंतर गेल्यावर घोडादेखील लोप होऊ लागला व म्हणाला,''मी तोच साप आहे ज्यास तू आपल्या जांगेतले मांस खाण्यासाठी दिलेस. मी देखील तुझ्या उपकारांच्या कर्जाची परतफेड करून चाललो आहे.''

पुढे थोडे अंतर गेल्यावर ती वयोवृद्ध महिलादेखील लुप्त होऊ लागली व वाण्याच्या मुलास म्हणाली,''मी तीच गाय आहे जिला तू पीठ खाण्यापासून रोखले नाहीस आणि आपल्या वडिलांचा विरोध पत्करून घर सोडून निघून गेलास. मी देखील आपल्या कर्जाची परतफेड केलेली आहे. आता तू आपले राज्य सांभाळ, प्रभू–परमेश्वराची भक्ती कर. साधु–संगतीत जा जेणेकरून तुझी खूप प्रगती होऊन तू परमेश्वराच्या निकट व्हावे.'' ***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रिय साधुसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजजींच्या अपार कृपेने यंदा मुंबई शहरात सत्संगाचा कार्यक्रम **बुधवार दि. ३ जानेवारी २०१८ पासून रविवार दि. ७ जानेवारी २०१८** पर्यंत खालील पत्त्यावर होईल. सर्व गुरूप्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की बाबाजींच्या मधुर आठवणीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी २ जानेवारी २०१८ रोजी सायंकाळी किंवा ३ जानेवारी २०१८ रोजी सकाळी खालील पत्त्यावर पोहोचून नामस्मरणाचा तसेच संत वचनांचा लाभ घ्यावा. परमपुज्य संत अजायब सिंह महाराजजींचा **भंडारा ७ जानेवारी २०१८** रोजी साजरा केला जाईल.

भूराभाई आरोग्य भवन,
शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमाजवळ,
कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७
फोन नं.: ०९३२४६७०३०१, ०९८३३००४०००, ०२२-२४९६५०००

सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

२ ते ६ फेब्रुवारी २०१८